# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/02/2024 (मंगळवार) दुपार


## अवैधरीत्या देशी दारुची साठवणूक व विदेशी दारू बाळगणाऱ्या आरोपीतांविरूद्ध नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन काटोल येथील स्टाफ काटोल हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मुखबिरव्दारे महिती मिळाली की, काटोल हद्दीतील मेटपांजरा शिवार येथे **आरोपी नामे— रोशन सोमाजी पंचधारे वय ५०  रा. मेटपांजरा काटोल** याने त्याचे राहते घरी देशी दारूची साठवणूक करून ठेवली आहे. अशा माहितीवरून घरझडती घेतली असता त्याच्या घराचे बाजूला त्यांचे मालकीचे असलेल्या खुल्या जागेमधील झाडीझुडपामध्ये एक  प्लास्टीक चुमडी नायलॉन दोरीने बांधुन दिसुन आली चुमडी खोलुन पाहीले असता त्यामध्ये देशी दारूच्या भिंगरी नं. ०१ असे लेबल लागलेल्या एकुण २४० प्लास्टीक बॉटल प्रत्येक १८० एम एल च्या प्रत्येकी किंमती ७०/— रू. असा एकुण १६,८००/— रूपयाचा मुद्देमाल अवैधरीत्या विनापरवाना साठवणूक करतांना मिळुन आल्याने आरोपीविरूद्ध पोस्टे काटोल येथे अप क्र. ९२/२४ कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

तसेच पोलीस स्टेशन काटोल हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मुखबिरव्दारे माहिती मिळाली की, दोडकीपुरा मेन रोड काटोल येथे दुपट्टा गुंडाळलेला एक इसम थैलीमध्ये दारू घेवुन तार बाजार येथुन आंबेडकर चौकाकडे जात आहे. अशा विश्वसनीय माहितीवरून आंबेडकर चौकात एक इसम तार बाजार कडुन येतांना दिसला. त्यास नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव शरद रामचंद्र खंडाईत रा. पारडसिंगा काटोल असे सांगितले. त्याचे जवळील नायलॉन थैलीची पाहणी केली असता थैलीमध्ये १) ओसी ब्लु कंपनिची काचेच्या १० निपा प्रत्येकी १८० एम एल प्रत्येकी किंमती १५० रू एकुण १,५००/— रू चा माल २) इंम्पेरियल ब्लु कंपनिची काचेच्या ०५ निपा प्रत्येकी १८० एमएल प्रत्येकी १६० रू  एकुण किंमती ८००/—रू. ३) रायल स्टग कंपनिची ०५ निपा प्रत्येकी १८० एम एल प्रत्येकी किंमती १८० एकुण ९००/—रू. असा एकुण ३२००/—रू. चा मुद्देमाल अवैधरीत्या जवळ बाळगुन पायी जातांना मिळुन आल्याने त्यास दारू बाळगण्याचा परवाना विचारला असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले. आरोपीविरूद्ध पोस्टे काटोल येथे अप क्र. ९३/२४ कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष ए. पोद्दार सर (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ साहेब यांचे मार्गदर्शनात पोस्टे काटोल येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम, पोहवा कैलास उईके, नापोशि भुषण मदनकर, पोना विकास वाईलकर यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर